www.PapaCambridge.com

UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Subsidiary Level and Advanced Level

**MARATHI** **8688/02**
**9688/02**

Paper 2 Reading and Writing **October/November 2008**

**1 hour 45 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer **all** questions.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are not permitted.
You should keep to any word limits given in the questions.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्व प्रथम खालील सूचना वाचा.**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.

उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.

गडद निळ्या अथवा काळ्या शाईच्या लेखणीने लिहावे.

टाचणी अथवा टाचण्याची कोणतीही अन्य साधने, वाक्यांना अधोरेखित करण्यासाठी रंगीत लेखणीचा वापर ,

डिंक किंवा चूक मजकूर खोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शाईचा वापर करू नये.

**सर्व** प्रश्न सोडवा.

उत्तर लिहिण्यासाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

शब्दकोषांचा उपयोग करण्यास मनाई आहे.

प्रश्नात नमूद केलेल्या शब्दसंख्येच्या मर्यादेत उत्तर लिहावे.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावीत.

प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा पोट प्रश्नांच्या शेवटी कंसात [ ] प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

SP (SLM/TL) T45984/1
© UCLES 2008

UNIVERSITY of CAMBRIDGE International Examinations

www.PapaCambridge.com

## विभाग -1

**सर्वप्रथम पुढील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

विसाव्या शतकापर्यंत कोळसा हाच ऊर्जाचा प्रत्यक्ष स्रोत होता. त्यानंतर पेट्रोलियमने त्याचे स्थान घेतले. औद्योगिक युगात पेट्रोलियमचे स्थान अनन्यसाधारण आहे. अनादिकाळापासून निसर्गाने ऊर्जाचे प्रचंड भांडार निर्माण करुन ते मानवाला बहाल केले. आधुनिक उद्योगांनी अत्यंत निष्ठूरतेने त्यांचे दोहन केले. भविष्यात कोळशासारखेच पेट्रोलियमचेही साठे संपुष्टात येतील हे लक्षात आल्यावर मानवाने भावी स्रोत म्हणून अणुऊर्जाचा शोध लावला. सध्यातरी एक प्रभावी स्रोत म्हणून अणुऊर्जाचे भविष्य ऊज्ज्वल आहे.

अणुऊर्जा ही दुधारी तलवार आहे. एका अर्थाने ती मानवाच्या कल्याणाला जशी उपयोगी पडते तशीच तिचा दुरुपयोग केला तर विश्वातील यच्चयावत मानवाच्या अस्तित्वालाही नष्ट करु शकते. अण्वस्त्रांचा विनाशकारी उपयोग दुसऱ्या महायुद्धात अनुभवास आला. अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर अणुबॉम्ब टाकला. त्यात लक्षावधी माणसे मृत्युमुखी पडलीत. विनाशाची इतकी भयंकर लीला मानवाच्या इतिहासात प्रथमच दिसून आली.

अण्वस्त्रांची भयंकर विनाशकारी शक्ती लक्षात आल्यावर अणुऊर्जाचा उपयोग स्वराष्ट्राच्या संरक्षणासाठी व शांतीपूर्ण विकासासाठी कसा करून घेता येईल या दृष्टीने जगातील राष्ट्रांचे विचारमंथन सुरू झाले. भविष्यात अण्वस्त्रांच्या निर्मितीची स्पर्धा वाढीस लागून तिसऱ्या जागतिक महायुद्धाचे ढग विश्वाच्या आकाशात जमा होण्याची भिती अनाठायी नव्हती. हा विनाश टाळण्यासाठी जगातील लहान व मोठी राष्ट्रे एकत्र आलीत. १९५५ मधे जिनेव्हा येथे आंतरराष्ट्रीय परिषद भरली. त्यात अणुऊर्जाचा उपयोग देशाच्या विकासासाठी व स्वसंरक्षणासाठी कसा करावा या धोरणाचा पाठपुरावा करणारा आराखडा तयार करण्यात आला. त्यानंतर वेळोवेळी या देशांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्र संघासारख्या जागतिक संघटनेमार्फत अण्वस्त्रांच्या निर्मितीवर बंधन घालण्याचा विचार केला. पण फारसा उपयोग झाला नाही.

अण्वस्त्रांच्या बळावर जागतिक सत्तासमीकरणे बदलू लागली. त्यामुळे दूर्बल किंवा अविकसित देशांची अण्वस्त्रक्षमता मर्यादित ठेवण्याची योजना बलाढ्य राष्ट्रे अंमलात आणण्यासाठी खटाटोप करु लागले. अण्वस्त्रचाचणी व अण्वस्त्रप्रसार कार्यक्रमावर बंदी या अटी लादण्यात आल्या. अमेरिका, रशिया, ब्रिटेन, आस्ट्रेलिया, फ्रान्स व चीन यासाठी मात्र वेगळे निकष लावण्यात आले. हे बलाढ्य देशांचे दडपशाहीचे धोरण अनेक देशांनी नाकारले. अण्वस्त्रबंदी करारावर सह्या करण्याचे अनेक राष्ट्रांनी नाकारले. या बलाढ्य देशांनी अण्वस्त्रांचा साठा स्वरक्षणाच्या नावाखाली जपायचा आणि इतर देशांनी मात्र तो नष्ट करावा ही व्यूहरचना इतर देशांना कदापि मान्य होण्यासारखी नव्हती. शिवाय अण्वस्त्रसंपन्न राष्ट्रांत परस्परांत ताण-तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यातून तिसरे महायुद्ध पेटले तर लहान देश भरडल्या जातील. हे व्हिएतनाम देशाच्या युद्धात दिसून आले.व्हिएतनामवर अमेरिकेने चढाई केली. त्यावेळी इतर दोस्त राष्ट्रे व लहान देशांना अनिच्छेने का होईना अमेरिकेला साथ द्यावी लागली. त्यात कंबोडिया, थायलंड, आस्ट्रेलिया व न्युझिलंड या देशांचा समावेश होता. या सर्व बाबींचा विचार करून संयुक्त राष्ट्रसंघ सामोपचाराने हे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

www.PapaCambridge.com

1 **खाली दिलेले शब्द वरील उताऱ्यातील आहेत. त्यांचे समान अर्थ असलेले शब्द लिहा व त्यांचा उपयोग करा. वाक्ये वरील उताऱ्यातील नसावीत.**

(i) अनन्यसाधारण

(ii) दोहन [1]

(iii) यच्चयावत [1]

(iv) अनाठायी [1]

(v) पाठपुरावा [1]

2 **पुढील वाक्यांचे कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे पुनर्लेखन करा.**
**उदाहरण -त्यानंतर पेट्रोलियमने त्याचे स्थान घेतले.(भविष्यकाळ)**
**उत्तर - त्यानंतर पेट्रोलियम त्याचे स्थान घेईल.**

(i) भविष्य काळात पेट्रोलियमचेही साठे संपुष्टात येतील (प्रश्नार्थक वाक्यरचना) [1]

(ii) अणुऊर्जा ही दुधारी तलवार आहे.(उद्गारवाचक वाक्यरचना) [1]

(iii) अण्वस्त्रांचा विनाशकारी उपयोग दुसऱ्या महायुद्धात अनुभवास आला.(विरूद्धार्थी वाक्यरचना) [1]

(iv) पण फारसा उपयोग झाला नाही. (वर्तमानकाळी क्रियापदाचे रुप लिहा) [1]

(v) हे बलाढ्य देशांचे दडपशाहीचे धोरण अनेक देशांनी नाकारले.(‘दडपशाही’ या शब्दाऐवजी दुसरा समानार्थी शब्द वापरा.) [1]

3 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. उताऱ्यातील वाक्ये वा शब्द उत्तरात नसावी. अन्यथा गुण कमी केल्या जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकुण गुण 15+5=20**

(i) विसाव्या शतकापर्यंत ऊर्जाचे कोणते दोन स्रोत होते ? [2]

(ii) आधुनिक उद्योगांनी ऊर्जांचे दोहन कशा प्रकारे केले ? [2]

(iii) अणुऊर्जा ही दुधारी तलवार आहे असे लेखक का म्हणतो ? [3]

(iv) अणुबॉम्ब टाकल्याने जपान देशात कोणता अनर्थ घडून आला ? [2]

(v) अण्वस्त्रप्रसारबंदीची योजना मोठ्या राष्ट्रांनी कोणत्या हेतूने आखली ? [3]

(vi) लहान देशांनी मोठ्या राष्ट्रांविरुद्ध अण्वस्त्रबंदीबद्दल कोणता विचार मांडला ? [3]

**एकुण गुण** [20]

www.PapaCambridge.com

## विभाग-2

**पुढील दुसरा गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

भविष्यात कोळसा आणि पेट्रोलियमची उणीव लक्षात घेता भारताने आपली दृष्टी अणुऊर्जेच्या वापराकडे वळविली आहे. अणुऊर्जाचा कार्यक्रम देशाच्या विकासासाठी व स्वसंरक्षणासाठी राबविण्याचे धोरण भारताने अंगिकारले आहे. या दृष्टीने अणुऊर्जाचा कार्यक्रम राबविण्यासाठी भारताने ॲटोमिक एनर्जी कमिशनची स्थापना १९४८ साली केली. त्याची कार्यालये महाराष्ट्रात मुंबई येथे व भारताची राजधानी दिल्ली येथे आहेत. कामाचा व्याप लक्षात घेऊन १९५४ साली आण्विकऊर्जा मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. अणुऊर्जाच्या कार्याला गती देण्यासाठी न्यूक्लीअर पॉवर कार्पोरेशनची स्थापना केली. अणुऊर्जाचे सारे उपक्रम या संस्थेच्या देखरेखेखाली कार्यान्वित होतात. अणुऊर्जाचे प्रकल्प भारतात नऊ ठिकाणी असून ते महाराष्ट्र, गुजरात, तमिळनाडू, उत्तरप्रदेश, राजस्थान व कर्नाटक या राज्यात उभारण्यात आले.

भारताने जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी, औद्योगिक विकासासाठी, स्वसंरक्षणासाठी व शांततामय मार्गाने देशाचा विकास घडवून आणण्यासाठी अणुऊर्जाचे धोरण आखले. परंतु शेजारी असलेल्या राष्ट्रांच्या आक्रमक हालचालीमुळे अण्वस्त्रनिर्मितीकडे लक्ष दिले. पाकिस्तानने भारतावर तीन वेळा युद्ध लादले. शेजारच्या बलाढ्य चीनने १९६२ साली भारतावर आंतरराष्ट्रीय सीमेचा मुद्दा उकरुन काढीत भारतावर चढाई केली. बदलती आंतरराष्ट्रीय समीकरणे लक्षात घेऊन भारताने अलिकडे अणुबॉम्ब तयार केला. त्याचे प्रथम १९७४ साली व नंतर २००३ मध्ये विस्फोट घडवून आणलेत. परंतु त्याचा उपयोग युद्धात न करता इत:पर कोणी युद्ध लादलेच तर स्वरसंरक्षणासाठी तयारीत असल्याचे इतर राष्ट्रांना कळावे हाच हेतू होता.

अणुबॉम्बच्या या विस्फोटाने साऱ्या जगाचे लक्ष वेधले. अमेरिका,चीन व रशिया यासारख्या अण्वस्त्रनिर्मितीत आघाडीवर असलेल्या राष्ट्रांच्या भुवया उंचावल्या. ही राष्ट्रे बेचैन झालीत. अण्वस्त्रनि:शस्त्रीकरणाचा मसूदा अमेरिकेने पुढाकार घेऊन संयुक्त राष्ट्र संघातर्फे मांडला होता. अनेक देशांनी स्वाक्षरी केल्या पण त्यावर भारताने इतर देशांप्रमाणे स्वाक्षरी करण्यास नकार दिला होता. भारताच्या मते नि:शस्त्रीकरणाची अट फक्त लहान राष्ट्रांवर व विकसनशील देशांवरच लादली जाऊ नये. ज्या मोठमोठ्या राष्ट्रांजवळ अण्वस्त्रांचा साठा भरपूर आहे त्यांच्यावरही नि:शस्त्रीकरणाची अट लादली जावी. आपली भूमिका मांडताना भारताने पुन:पुन्हा स्पष्ट केले की अणुऊर्जाचा कार्यक्रम आजही आम्ही शांततेसाठीच राबवू, आक्रमणासाठी नाही. त्यामुळे नाराज होऊन या बड्या राष्ट्रांनी भारताला युरेनियमचा पुरवठा व तांत्रिक मदत देण्यावर निर्बंध घातले होते. अलिकडे भारत ही एक मोठी आर्थिक सत्ता म्हणून समोर येत आहे. विज्ञान, संगणक, संशोधन, तंत्रज्ञान या क्षेत्रातील त्याची प्रगती नजरेआड करणे शक्य नाही असे लक्षात येता ही बंधने व अटी शिथिल करण्यात आली. अणुऊर्जाचा कार्यक्रम भारतात शांततेच्या मार्गाने जात आहे याची खात्री या पाश्चात्य देशांना पटल्याचे हे द्योतक आहे.

www.PapaCambridge.com

**4 पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्**
**उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केल्या जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकुण गुण 15+5=20**

**(i)** भारतात ॲटोमिक एनर्जी कमिशनची स्थापना करण्याची आवश्यकता का वाटली ? [2]

**(ii)** भारतात अणुऊर्जाचे कार्यक्रम कोणकोणत्या संस्थेमार्फत आखल्या जातात ? [3]

**(iii)** अणुऊर्जाविषयी भारताचे धोरण स्पष्ट करा. [3]

**(iv)** अणुबॉम्ब चाचणीचा प्रयोग का करण्यात आला ? [3]

**(v)** आण्विकनि:शस्त्रीकरणाच्या करारावर भारताने स्वाक्षरी का केली नाही ? [2]

**(vi)** अलिकडे बड्या राष्ट्रांचे भारताविषयी धोरण का बदलले ? [2]

**एकुण गुण** [20]

**5 पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. दोन्ही प्रश्नांची मिळून होणारी शब्दसंख्या 140 पर्यंत मर्यादित असावी. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये वा शब्द उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केल्या जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण 15+5=20**

**(i)** वरील दोन्ही उताऱ्यांच्या आधारे अणुऊर्जाचे महत्त्व सांगून मोठ्या राष्ट्रांचे व लहान देशांचे अणुचाचणी व अण्वस्त्रनि:शस्त्रीकरणाबाबतचे धोरण विशद करा. [10]

**(ii)** तुमच्या मॉरिशस देशातील अणुऊर्जेच्या कार्यक्रमावर प्रकाश टाका. [5]

**एकुण गुण** [20]

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of